पुणे पोलीस


**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478

Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.

NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,

PUNE MAHARASHTRA - 411001

E-Mail ID : crimepress.pune@gov.in


**प्रेसनोट क्र.३०५६ दिनांक २२/०९/२०१९**

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणे शहर

## गणेशोत्सव कालावधीमध्ये मोबाईल चो-या करणारा चोरटा पोलीसांकडुन जेरबंद

दिनांक-१२/०९/२०१९ रोजी सार्वजनिक गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान अनेक नागरीक विसर्जन मिरवणुकीचा सोहळा पाहाण्यासाठी रस्त्यावर गर्दी करीत असतात. याच गर्दीचा गैरफायदा घेवुन काही चोरटे नागरीकांमध्ये सामावुन त्यांचे पर्स,मोबाईल गवैरे ऐवज लंपास करीत असतात. अशाच प्रकारे सदर विसर्जन मिरवणुकीचा सोहळा पाहात असतांना गर्दीमध्ये ०३ नागरीकांचे मोबाईल हॅण्डसेट चोरीस गेले बाबत विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर येथे गुन्हा नोंद क्रमांक-३२२/२०१९, ३२३/२०१९ व ३२४/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे गुन्हे नोंद करण्यांत आलेले होते.

माननीय स्वप्ना गोरे मॅडम, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, व माननीय श्री.सुधाकर चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त, विश्रामबाग विभाग,पुणेशहर यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास चालु असतांना दिनांक-१३/०९/२०१९ रोजी तपास पथकाचे पोलीस कर्मचारी राहुल पवार व सचिन जगदाळे यांना टकले हवेली चौकामध्ये एक इसम संशयास्पदरित्या फिरतांना दिसला. सदरवेळी त्यांनी त्यांस ताब्यात घेवुन त्याचे नांव,पत्ता विचारता त्याने आपले नांव सोनु राजु पवार, वय-२० वर्षे, राहणार-आसेगांव फाटा, ता.गंगापुर, जिल्हा-औरंगाबाद असे सांगितले. त्यास सदर ठिकाणी येण्याचे कारण विचारले असता तो उडवाउडवीची उत्तरे देवु लागल्याने त्याचेबद्दल पोलीसांचा संशय बळावला. सदरवेळी विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दादासाहेब चुडाप्पा व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राम राजमाने यांचे अधिपत्याखाली पोलीस उप निरीक्षक श्री. विजय जाधव व स्टाफने त्याचेकडे कसुन तपास केला असता त्याने मोबाईल चोरल्याचे कबुल केले. त्याचेकडे केलेल्या अधिक तपासामध्ये त्याचेकडुन वरनमुद ०३ मोबाईल चोरीच्या गुन्हयामध्ये चोरीस गेलेले मोबाई (१) एक टेक्नो कंपनीचा आय एन-५ मॉडेलचा १०,०००/-रुपये किंमतीचा मोबाई हॅण्डसेट, (२) एक ण्म आय कंपनीचा अे-१ मॉडेलचा १०,०००/-रुपये किंमतीचा मोबाईल हॅण्डसेट (३) एक सॅमसंग कंपनीचा जे-७ मॉडेलचा १२,०००/-रुपये किमतीचा मोबाईल हॅण्डसेट असे एकुण ३२,०००/-रुपये किंमतीचे ०३ मोबाईल हॅण्डसेट जप्त करुन वरनमुद ०३ मोबाईल चोरीचे गुन्हे उघडकींस आणुन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.